## 'कला' तर्फे ४ अर्थपूर्ण कार्यक्रम

सॅन फ्रॅन्सिस्को बे एरियामध्ये मनोरंजनाबरोबरच अर्थपूर्ण अनुभूती देण्याचा 'कला'चा सातत्याने प्रयत्न चालू आहे. ह्याच परंपरेत 'कला'ने चार महत्त्वपूर्ण कार्यक्रम सादर केले.

### १. 'दशावतार – लोककला कोकणची...' माहितीपट:

'दशावतार – लोककला कोकणची...' हा अशोक राणे निर्मित–दिग्दर्शित माहितीपट कोकणच्या पारंपरिक लोककलेचा, तिच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि कलात्मक वैशिष्ट्यांचा मनोज्ञ वेध घेतो. दशावतारी नाटक म्हणजे कोकणातल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या गावोगावच्या जत्रांचं, मंदिरांच्या उत्सवांचं एक महत्त्वाचं अंग. या नाटकांना लिखित संहिता नसते. पुराणादी साहित्याच्या वाचनातून, बहुश्रुततेतून आणि लोकजीवनाच्या निरीक्षणातून कलावंत स्वतःच ही नाटकं प्रेक्षकांसमोर उभी करतात. प्रस्तुत माहितीपट या कलाप्रकाराच्या अशा वैशिष्ट्यांचा, त्यातल्या संगीताचा, संवादशैलीचा, अभिनयशैलीचा रसरशीत मागोवा घेतो. यक्षगान, कथाकली, जात्रा, छाऊ या भारतातील इतरत्रच्या लोकरंगभूमीशी दशावतारी नाटकांच्या संबंधांची, साम्याची आणि वेगळेपणाची उद्बोधक चर्चा करतो. भारतीय प्राचीन नाट्यशास्त्रापासून ते अगदी आधुनिक देशी–विदेशी नाट्यप्रवाहांशी त्यांचं नातं ताडून पाहतो. प्रत्यक्ष दशावतारी नाटकांच्या भूमीत, कोकणच्या निसर्गसुंदर परिसरात, दशावतारी कलाकारांसोबत फिरत, त्यांचं चित्रण करीत, त्यांच्याशी संवाद साधत बनवलेल्या या माहितीपटामुळे कलाप्रेमींना या लोककलेचे सर्वांगसुंदर दर्शन घडले.

### २. 'तात्या टोपे यांचे ऑपरेशन रेड लोटस' या पुस्तकाचे लेखक श्री. पराग टोपे यांच्याबरोबर गपागोष्टी:

एकविसाव्या शतकातील यशाची 'मॅनपॉवर, लॉजिस्टिक्स, व कम्युनिकेशन टूल्स' ही त्रिसूत्री दीडशे वर्षांपूर्वी तात्या टोपे या मराठी योद्ध्याने वापरली आणि इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. जगाच्या इतिहासात १८५७चे स्वातंत्र्यसमर अजरामर केले. श्री. पराग टोपे यांनी तात्या टोपे यांच्या इतर वंशजांच्या मदतीने चार वर्षे अथक परिश्रम घेऊन, महान योद्धा, कूटनीतीतज्ज्ञ आणि अत्यंत कुशल नियोजनकार अशी तात्या टोपे यांच्या व्यक्तिमत्त्वाची विविध अंगे दाखविणारा हा ग्रंथ प्रसिद्ध केला. 'तात्या टोपे यांना इंग्रजांनी फाशी दिली' हा आजवर वाचलेला इतिहास चुकीचा असून त्यांना लढताना वीरमरण आले हे या ग्रंथाने सप्रमाण दाखवून दिले आहे. श्री. पराग टोपे त्यांच्या सर्व इतिहास संशोधनाबद्दल भरभरून सांगत होते आणि श्रोते अक्षरशः मंत्रमुग्ध होऊन गेले होते.




### ३. कामगार कवी श्री. नारायण सुर्वे यांना आदरांजली:

कामगार, कष्टकरी, वंचित वर्गांच्या व्यथा–वेदनांना धारदार शब्दरूप देणारे, रोजच्या जगण्यातले संघर्षमय वास्तव साध्या आणि थेट शब्दांत मांडणारे, कामगार कवी म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. नारायण सुर्वे यांचे या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात निधन झाले. 'ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती' अशा ओळींनी प्रारंभ होणारी 'माझे विद्यापीठ' ही कविता म्हणजे या कवीचे आत्मचरित्रच! 'कामगार आहे मी तळपती तलवार आहे, सारस्वतांनो, थोडासा गुन्हा करणार आहे' अशा शब्दांत श्रमिकांच्या वेदना कवितेतून मांडणारे कविवर्य नारायण सुर्वे यांच्या निधनाने महाराष्ट्र एका क्रांतिकारी कवीला मुकला. 'कला'तर्फे सादर केलेल्या



आदरांजलीच्या कार्यक्रमात मंदार आणि शुभा कुलकर्णी यांनी श्री. नारायण सुर्वे यांच्या कवितांचे रसपूर्ण वाचन केले आणि त्यांच्याबद्दल माहितीही सांगितली. त्याचबरोबर श्री. अरुण खोपकर दिग्दर्शित 'नारायण गंगाराम सुर्वे' हा लघुपटही दाखवला.

### ४. प्रसिद्ध चित्रपट कलावंत आणि नाट्यकर्मी श्री. चंद्रकांत गोखले यांच्या स्मृतीला मानाचा मुजरा:

चंद्रकांत गोखले म्हणजे गेली अनेक वर्षे परिपूर्ण कलाविष्काराने मराठी रसिकांच्या मनात एक आदराचं स्थान मिळवलेला स्वयंसिद्ध अभिनेता! ८७व्या वर्षापर्यंत अभिनयक्षेत्रात लीलया वावरणाऱ्या या कलाकाराचं सर्वार्थानं शेवटचं ठरलेलं मनोगत, सुपर्णा गांगल हिनं कॅमेऱ्यानं टिपलं. ५ जून २००८ या दिवशी पूर्ण उत्साहाने स्वतःच्या अनुभवांविषयी भरभरून बोलणारा हा कलाकार २० जूनला काळाच्या पडद्याआड निघून गेला. ह्या ५७ मिनिटांच्या लघुपटाचं वैशिष्ट्य म्हणजे त्यातला सच्चेपणा आणि निर्मळता. कुठेही संकलनाची कात्री न लावता जशीच्या तशी सादर केलेली ही मुलाखत कलाप्रेमींच्या हृदयाला स्पर्श करून गेली.

**मुकुंद मराठे**
**'कला'**